29 JUL 2024 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# शासनाच्या शैक्षणिक योजनांचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा

## उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांचे आवाहन : विद्यार्थ्यांशी ऑनलाईन संवाद

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने विद्यार्थी–विद्यार्थिनींसाठी अनेक शिष्यवृत्तींसह विविध योजना राबविण्यात येत आहेत, त्यांचा लाभ घेऊन उच्चशिक्षण क्षेत्रातील आपली वाटचाल सुकर करावी, असे आवाहन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले. मंत्री पाटील यांनी गुरूवारी सकाळी १० वाजता ऑनलाईन वेबिनारच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठासह राज्यातील विविध विद्यापीठांतील विद्यार्थी, पालक, शिक्षक यांच्याशी संवाद साधला. यावेळी ते बोलत होते.

मंत्री पाटील म्हणाले, ७ ऑक्टोबर २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम



विनाअनुदानित महाविद्यालये, तंत्रनिकेतने, सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) आणि सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त बिगर–व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेशित कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न आठ लाख रुपये किंवा त्यापेक्षा कमी आहे. अशा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुला–मुलींना शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्कात शंभर टक्के लाभ देण्यात येतो. त्याचप्रमाणे नुकत्याच ८ जुलै २०२४ रोजी घेण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी, ज्या मुलींच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न आठ लाख रुपये किवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील, इतर मागास प्रवर्गातील, सामायिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या) मुलींना शंभर टक्के लाभ देण्यास शासनाने मान्यता दिली असल्याची माहिती मंत्री पाटील यांनी यावेळी दिली. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या वेबिनारला कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, उपकुलसचिव भक्ती नाळे, अधिविभागप्रमुख, शिक्षक, विद्यार्थी–विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**महाविद्यालयांनी शिष्यवृत्ती कक्ष स्थापन करावा**

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केलेल्या सुचनेनुसार सर्व महाविद्यालयांनी शिष्यवृत्ती कक्ष स्थापन करावा. जेणेकरून एकही मुलगी शिष्यवृत्तीपासून वंचित राहणार नाही याची महाविद्यालयांनी दक्षता घ्यावी. उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी केलेल्या सुचनांचे पालन करावे.

**–डॉ. अशोक उबाळे** (उच्च शिक्षण विभागीय सहसंचालक, कोल्हापूर)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 JUL 2024
पुढारी

# डॉ. अजितकुमार डांगे यांचे निधन



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र अधिविभाग प्रमुख तथा माजी प्रभारी कुलगुरू डॉ. अजितकुमार डांगे (वय ६८, रा. कवठेएकंद, जि. सांगली) यांचे पुणे येथे निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले, सुना असा परिवार आहे.

डॉ. डांगे यांनी विद्यापीठात अर्थशास्त्राचे प्राध्यापक, अधिविभाग प्रमुख, कुलसचिव, बीसीयूडीचे संचालक, प्रभारी कुलगुरू आदी पदांवर काम केले होते. त्यांनी अरुणाचल प्रदेश येथील अपेक्स प्रोफेशनल युनिव्हर्सिटीचे कुलगुरू म्हणून योगदान दिले आहे. पुण्यातील खासगी रुग्णालयात उपचारादरम्यान त्यांचे निधन झाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 JUL 2024
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाचे माजी प्रभारी कुलगुरू डॉ. अजितकुमार डांगे यांचे निधन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्रअधिविभाग प्रमुख तथा माजी प्रभारी कुलगुरू डॉ. अजितकुमार डांगे (वय ६८, रा. कवठेएकंद, जि. सांगली) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना असा परिवार आहे. त्यांच्या जाण्याने शिक्षण क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाल्याची भावना शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांनी व्यक्त केल्या.



डॉ. अजितकुमार डांगे यांनी विद्यापीठात अर्थशास्त्राचे प्राध्यापक, अधिविभागप्रमुख, कुलसचिव, बीसीयुडीचे संचालक, प्रभारी कुलगुरू आदी पदावर काम केले होते. त्यांनी अरुणाचल प्रदेश येथील अपेक्स प्रोफेशनल युनिव्हर्सिटीचे कुलगुरू म्हणून योगदान दिले आहे. पुण्यातील खासगी दवाखान्यात उपचारादरम्यान त्यांचे निधन झाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

29 JUL 2024
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आज होणाऱ्या परीक्षा स्थगित

## परीक्षा व मूल्यमापन मंडळाची परिपत्रकाव्दारे माहिती

प्रतिनिधी
कोल्हापूर

विद्यापीठ परिक्षेत्रात पूर आल्यामुळे शिवाजी विद्यापीठ अंतर्गत २९ जुलै रोजी होणाऱ्या सर्व परीक्षा स्थगित करण्यात आल्या आहेत. यामध्ये पदव्युत्तर प्रवेश परीक्षा आणि बी. टेक., आर्किटेक्चर परीक्षांचा समावेश आले. स्थगित केलेल्या परीक्षांचे वेळापत्रक यथावकाश जाहीर करण्यात येणार आहे, अशी शिवाजी विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली. कोल्हापूर, सांगली, सातारा तिन्ही जिल्ह्यात गेल्या अतिवृष्टी सुरू आहे.तिन्ही जिल्ह्यात पूर आला आहे. नदीकाठावरील गावांचे स्थलांतर करण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षेला येण्यासाठीचे काही मार्ग बंद झाल्याने २९ जुलै रोजी होणाऱ्या परीक्षा स्थगित करण्याचा निर्णय विद्यापीठ प्रशासनाने घेतला आहे. तरी महाविद्यालय व विद्यार्थ्यांनी परीक्षा स्थगित केल्याची नोंद घ्यावी, असे आवाहन विद्यापीठातील परीक्षा विभागाकडून करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 JUL 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाकडून आजच्या सर्व परीक्षा स्थगित

## महाविद्यालयांना सूचना; अतिवृष्टीचा विद्यार्थ्यांना फटका

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

अतिवृष्टी व पुराची स्थिती अद्याप कायम असल्याने शिवाजी विद्यापीठाने सोमवारी (दि. २९) होणाऱ्या नियमित आणि काही अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा स्थगित केल्या आहेत. याचा विद्यार्थ्यांना फटका बसला आहे.



विद्यापीठाच्या वतीने मार्च-एप्रिल २०२४ उन्हाळी सत्रातील परीक्षा सुरू आहेत. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांत गेल्या काही दिवसांपासून अतिवृष्टी सुरू आहे. अतिवृष्टीमुळे विद्यापीठाने टप्प्याटप्प्याने २२ जुलैपासून परीक्षा रद्द केल्या आहेत. सध्या पावसाने उसंत दिली असली, तरी नद्यांची पाणीपातळी कायम आहे. काही भागातील रस्ते बंद आहेत. विद्यार्थ्यांना परीक्षेच्या ठिकाणी पोहोचण्यासाठी अडचणी येऊ शकतात. परिणामी, विद्यार्थी हिताचा विचार करून विद्यापीठाने सोमवारी होणाऱ्या बी.टेक., आर्किटेक्चरसह पदव्युत्तर पदवीच्या प्रवेश परीक्षा स्थगित केल्या आहेत. स्थगित करण्यात आलेल्या परीक्षांचे सुधारित वेळापत्रक नव्याने जाहीर करण्यात येईल, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

### परीक्षा निकालावर परिणाम होण्याची शक्यता

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने सध्या उन्हाळी सत्रातील परीक्षा सुरू आहेत. गेल्या काही दिवसांपासून कोल्हापूरसह सांगली, सातारा जिल्ह्यांत अतिवृष्टी सुरू आहे. यामुळे विद्यापीठाने २२ जुलैपासून विद्यापीठाच्या सर्व परीक्षा स्थगित केल्या आहेत. परिणामी, महापुराचा निकालावर परिणाम होण्याची शक्यता आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 JUL 2024
लोकमत



# आजच्या पदव्युत्तर परीक्षा स्थगित

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : अतिवृष्टीमुळे विद्यार्थ्यांना परीक्षेच्या ठिकाणी पोहोचण्यासाठी अडचणी लक्षात घेऊन शिवाजी विद्यापीठाने २९ जुलैला आयोजित केलेली पदव्युत्तर परीक्षा स्थगित केली आहे. ही माहिती विद्यापीठाचे परीक्षा आणि मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

विद्यापीठाच्या पदव्युत्तर परीक्षा २९ जुलैला अभियांत्रिकी अधिविभागात आयोजित केली होती, मात्र जिल्ह्यातील अनेक गावांत पूरस्थिती आहे. विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी येण्यास अडचण निर्माण झाली आहे. त्यामुळे या परीक्षांचे सुधारित वेळापत्रक लवकरच जाहीर केले जाणार आहे. स्थगितीचे परिपत्रक संबधित प्राचार्य, संचालक, अधिविभागप्रमुख, समन्वयक, संलग्नित महाविद्यालये, मान्यताप्राप्त संस्था आणि विद्यापीठातील अधिविभागांना पाठविले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 JUL 2024
पुण्यनगरी

**In Short**

# शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा स्थगित

**कोल्हापूर :** कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील पूर परिस्थितीमुळे विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रापर्यंत पोहोचणे अडचणीचे ठरत आहे. त्यामुळे सोमवार, दि. २९ जुलै रोजीच्या परीक्षा स्थगित करण्याचा निर्णय विद्यापीठ प्रशासनातर्फे घेतल्याची माहिती शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी पत्रकाद्वारे दिली आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील तिन्हीही जिल्ह्यात पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. पुराचे पाणी रस्त्यावर आल्याने वाहतूक बंद झाली आहे. त्यामुळे परीक्षांसाठी परीक्षा केंद्रांवर पोहोचणे विद्यार्थ्यांना अडचणीचे ठरत आहे. त्यासाठी सोमवार, दि. २२ रोजीपासून विद्यापीठाच्या परीक्षा स्थगित केल्या होत्या. आता पुन्हा पूर परिस्थिती लक्षात घेऊन सोमवार, दि. २९ रोजी होणाऱ्या परीक्षाही स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. पेपरच्या नव्या तारखा विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केल्या जातील, अशी माहितीही त्यांनी दिली.

**प्रवेश परीक्षाही स्थगित :** विद्यापीठाच्या पदव्युत्तर प्रवेश अभ्यासक्रमाच्या परीक्षांचे आयोजन विद्यापीठाच्या अभियांत्रिकी अधिविभागात केले होते; मात्र पूर परिस्थिती लक्षात घेऊन सोमवार, दि. २९ जुलै रोजी होणाऱ्या पदव्युत्तर प्रवेश परीक्षाही स्थगित केल्या आहेत. या परीक्षांचे सुधारित वेळापत्रक यथावकाश जाहीर केले जाणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

29 JUL 2024
सकाळ

# पूरस्थितीमुळे विद्यापीठाच्या आजच्या परीक्षा स्थगित

कोल्हापूर, ता. २८ : अतिवृष्टीमुळे कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांत पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाने उद्या, सोमवारी होणाऱ्या सर्व परीक्षा स्थगित केल्या आहेत. त्यात विविध २४ अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांचा समावेश आहे.



अतिवृष्टी सुरू झाल्याने पहिल्यांदा २२ जुलैच्या परीक्षा स्थगित केल्या. त्यानंतर पावसाचा जोर कायम राहिल्याने पूरस्थिती निर्माण झाली. अशा स्थितीत अनेक ठिकाणचे मार्ग वाहतुकीसाठी बंद झाले. त्यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर येणे शक्य होत नसल्याचे लक्षात घेऊन २५ ते २७ जुलैपर्यंतच्या परीक्षा स्थगित केल्या. पूरस्थिती असल्याने विद्यापीठाने सोमवारी होणाऱ्या परीक्षाही स्थगित केल्या. त्यात बी. टेक., आर्किटेक्चर अभ्यासक्रमांच्या परीक्षा तसेच एम. एस्सी. फिजिक्स, केमिस्ट्री, बॉटनी, झूलॉजी, मॅथेमेटिक्स, बीजेसी., एमजेसी अशा २४ अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांचा समावेश आहे. परीक्षांच्या सुधारित तारखा लवकरच जाहीर केल्या जातील, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 JUL 2024
सकाळ

# भगवान महावीर अध्यासनाच्या बैठकीत निधी संकलनावर चर्चा

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २८ : शिवाजी विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासनाच्या विशेष बैठकीत निधी संकलनावर चर्चा करण्यात आली. जैन बोर्डिंगमधील या बैठकीस अध्यासन सल्लागार समितीचे सदस्य, कोल्हापुरातील व्यापारी, उद्योजक, डॉक्टर उपस्थित होते.

प्रा. विजय ककडे यांनी अध्यासनाच्या नूतन इमारतीचा आराखडा आणि त्यासाठी आवश्यक निधीची माहिती दिली. कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष संजय शेटे यांनी देणगी संकलनाबाबत केलेल्या प्रयत्नांचा आढावा घेतला. श्वेतांबर जैन समाज आणि इतर समाजातील व्यक्तींकडून देणगी संकलनाचा प्रयत्न करावा असे त्यांनी सुचविले. भिलवडी येथील जिवंधर चौगले यांनी व्यक्तीगत संपर्कातून देणगी संकलन करण्यावर भर द्यावा, असे सांगितले. एस. पी. वेल्थचे संस्थापक अनिल पाटील यांनी अकरा हजार रुपयांची देणगी दिली. जैन बोर्डिंगचे सचिव सुरेश शेटे यांनी प्रास्ताविक केले.